# रिस्क - तळीराम

दारू पिताना मी कधीच रिस्क घेत नाही
मी संध्याकाळी घरी येतो, तेव्हा बायको स्वयंपाक करत असते,
शेल्फ़मधील भांड्यांचा आवाज बाहेर येत असतो,
मी चोरपावलाने घरात येतो,
माझ्या काळ्या कपाटातून बाटली काढतो,
शिवाजीमहाराज फ़ोटोतून बघत असतात, तरी या कानाचा त्या कानाला पत्ता लागत नाही,
कारण मी कधीच रिस्क घेत नाही . . . II 1 II

वापरात नसलेल्या मोरितल्या फ़ळीवरून मी ग्लास काढतो,
पटकन एक पेग भरून आस्वाद घेतो,
ग्लास धुवून पुन्हा फ़ळीवर ठेवतो,
अर्थात बाटलीही काळ्या कपाटात ठेवतो,
शिवाजीमहाराज मंद हसत असतात,
स्वैपाकघरात डोकावून बघतो,
बायको कणिकच मळत असते,
या कानाचा त्या काना पत्ता लागत नाही,
कारण मी कधीच रिस्क घेत नाही . . . II 2 II

मी : जाधवांच्या मुलीच्या लग्नाचं जमलं का गं ?
ती : छे ! दानत असेल तर मिळेल ना चांगलं स्थळ !

मी परत बाहेर येतो, काळ्या कपाटच्या दाराचा आवाज होतो,
बाटली मात्र मी हळूच काढतो,
वापरात नसलेल्या फ़ळीच्या मोरीवरून ग्लास काढतो,
पटकन पेगचा आस्वाद घेतो, बाटली धुवून मोरीत ठेवतो,
काळा ग्लासपण कपाटात ठेवतो,
तरी या कानाचा त्या कानाला पत्ता लागत नाही,
कारण मी कधीच रिस्क घेत नाही . . . II 3 II

मी : अर्थात जाधवांच्या मुलीचं अजून काही लग्नाचं वय झालं नाही?
ती : नाही का SS य ! अठ्ठावीस वर्षांची घोडी झालिये म्हणे. . .
मी : ( आठवून जीभ चावतो ) अच्छा अच्छा. . .

मी पुन्हा काळ्या कपाटातून कणिक काढतो,
मात्र कपाटाची जागा आपोआप बदललेली असते,

फ़ळीवरून बाटली काढून पटकन मोरीत एक पेग मारतो,
शिवाजीमहाराज मोह्याने हसतात,
फ़ळी कणकेवर ठेवून शिवाजींच्या फ़ोटो धुवून मी काळ्या कपाटात ठेवतो,
बायको गॅसवर मोरीच ठेवत असते,
या बाटलीचा त्या बाटलीला पत्ता लागत नाही,
कारण मी कधीच रिस्क घेत नाही ... II 4 II

मी : ( चिडून ) जाधवाना घोडा म्हणतेस ? पुन्हा बोललीस तर जिभंच कापून टाकेन तुझी...!
ती : उगीच कटकट करू नका.... बाहेर जाऊन गप पडा...

मी कणकेमधून बाटली काढतो, काळ्या कपाटात जाऊन एक पेग मळतो,
मोरी धुवून फ़ळीवर ठेवतो,
बायको माझ्याकडे बघत हसत असते,
शिवाजीमहाराजांचा स्वैपाक चालूच असतो,
पण या जाधवांचा त्या जाधवाना पत्ता नाही,
कारण मी कधीच रिस्क घेत नाही ... II 5 II

मी : ( हसत हसत ) जाधवानी घोडीशी लग्न ठरवलं म्हणे !
ती : ( ओरडून ) तोंडावर पाणी मारा !!

मी परत स्वैपाकघरात जातो, हळूच फ़ळीवर जाऊन बसतो,
गॅसही फ़ळीवरच होता...
बाहेरच्या खोलीतून बाटल्यांचा आवाज येतो,
मी डोकावून बघतो...बायको मोरीत दारूचा आस्वाद घेत असते,
या घोडीचा त्या घोडीला पत्ता लागत नाही,
अर्थात शिवाजीमहाराज कधीच रिस्क घेत नाहीत...
जाधवांचा स्वैपाक होईपर्यंत....
मी फ़ोटोतून बायकोकडे बघत हसत असतो....
कारण मी कधीच रिस्क घेत नाही ... II 6 II

